## प्रेसनोट ता. ०६/०९/२०१८

## ०४ तासांत कुरीयर कंपनीमधील चोरीचा गुन्हा उघड

दि. ०४/०९/२०१८ रोजी डेलीव्हरी प्रायव्हेट लिमीटेड कुरीयर कंपनी, कोंढवा बु‌ा पुणे या कंपनीमध्ये ऑनलाईन कुरीयर डिलेव्हरी करुन जमा झालेली रक्कम ५,५०,०००/- रुपये ऑफीसमध्ये लपवुन ठेवली होती. ती रक्कम अज्ञात चोरटयाने कंपनीचे खिडकीवाटे ऑफीसमध्ये प्रवेश करुन चोरुन नेली होती. त्याबाबत महिला नामे. दामिनी विमल ठाकर, शिवाजीनगर पुणे यांनी तक्रार दिलेली होती.

गुन्हा घडलेल्या ठिकाणी कोंढवा पोलीसांनी भेट देवुन घटनास्थळाची पाहणी केली असता, सदरचा गुन्हा कंपनीतील कोणीतरी माहितीगार कामगारानेच केला असावा असा संशय आल्याने त्या संशयावरुन डिलेव्हरी कुरीयर कंपनीमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मच्याऱ्यांकडे पोलीसांनी चौकशी करता त्या चौकशीमध्ये वेंडर काम करणारा मुलगा नामे. भिमा शिवाजी सोनवणे वय. २५ वर्षे रा. जनता वसाहत पर्वती पुणे याचेवर अधिक संशय आल्याने त्याचेकडे कौशल्यपुर्वक व सचोटीने तपास केला असता, त्याने डिलेव्हरी कुरीयर कंपनीमध्ये चोरी केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याने देखील ऑफीसचे खिडकीवाटे ऑफीसमध्ये प्रवेश करुन जमा झालेले ५,५०,०००/- रुपये चोरुन नेले असल्याचे कबुल केले. नमुद आरोपीना चोरलेले रक्कम रुपये ५,५०,०००/- रुपये (इनटॅक्ट) जशीच्या तशी जप्त करणेत आलेली आहे. नमुद आरोपीकडे गुन्हा करण्याचे हेतुबाबत तपास केला असता, त्याने सांगितले की, मी काही दिवसांपुर्वी मोटरसायकल खरेदी केली असुन सदर मोटरसायकलचे कर्ज फेडणेकामी मी चोरी केलेली आहे.अशा प्रकारे कोंढवा पोलीसांनी सदरचा गुन्हा कौशल्यपुर्वक व सचोटीने तपास करुन ०४ तासात उघड केला आहे.

सदरची कामगिरी मा.सुनिल फुलारी सो. अप्पर पोलीस आयुक्त,उत्तरप्रादेशिक विभाग पुणे शहर,मा.प्रकाश गायकवाड सो.पोलीस उप आयुक्त परिमंडळ -५,मा.मिलिंद पाटील सो. सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद गायकवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंढवा पोलीस स्टेशन पुणे,श्री.महादेव कुंभार पोलीस निरीक्षक (गुन्हे) कोंढवा पो.स्टे.पुणे व पोलीस उप निरी संतोष शिंदे,पो.हवा.संजय कदम,राजस शेख,विलास तोगे,पोलीस नाईक योगेश कुंभार,पृथ्वीराज पांडुळे, अमित साळुंके,सुरेंद्र कोळगे,उमाकांत स्वामी,अजिम शेख,मोहन मिसाळ या पथकाने अथक परीश्रम घेवुन केली आहे.